REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी
करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ६ | पुणें, बुधवार, तारीख २७ मार्च, १९४० | अंक १३

'अर्थ' ग्रन्थमाला

## बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

दुसरी आवृत्ति तयार झाली.

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकासहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—( १ ) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
( २ ) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

## विविध माहिती

### हिंदी सरकारी रेल्वेजचें उत्पन्न

एप्रिल ते फेब्रुवारी

| | रु. |
|---|---|
| १९३७–३८ | ८५ कोटि, ६९ लक्ष |
| १९३८–३९ | ८५ कोटि, ७६ लक्ष |
| १९३९–४० ( अंदाजें ) | ८८ कोटि, ६७ लक्ष |

### तापी व्हॅली रेल्वे कं. लि.

वरील कंपनीस १९३९ सालीं १० लक्ष, ४१ हजार रुपये नफा झाला. भागीदारांस ८ % डिव्हिडंड मिळालें.

### चेक्सची देवघेव

मुंबई बँकिंग क्लिअरिंग हौसमध्यें १५ मार्च अखेर संपलेल्या वर्षी २१ कोटि, ६८ लक्ष रुपये किंमतीच्या १,२५,६३० चेक्सची देवघेव झाली.

### इटलीस कोळशाचा पुरवठा

इटलीचा जर्मनीशीं तह झाला आहे त्यास अनुसरून इटलीस जर्मनीकडून दरसाल ९० लक्ष टन कोळसा मिळूं शकेल. आणखी ३० लक्ष टन कोळसा इटलीस लागेल, तो इतर देशांतून आणावा लागेल. रशियांतून तो येऊं शकेल, असें एक इटालियन वृत्तपत्र म्हणतें.

### पोलादाचें उत्पादन

ग्रेटब्रिटनमधील पोलादाचें वार्षिक उत्पादन सुमारें १ कोटि, ४५ लक्ष टन होतें. त्यांत ब्रिटिश साम्राज्यांतील इतर देशांचें उत्पादन मिळवलें तर एकूण उत्पादन १ कोटि, ८५ लक्ष टन होतें. म्हणजे, गेल्या महायुद्ध काळांतील उत्पादनापेक्षा हें दुपटीनें अधिक भरतें.

### हिंदी सुतास मागणी

ग्रेटब्रिटननें हिंदुस्थानांतून मोठ्या प्रमाणावर सूत मागविलें असून तें पुरविण्यांत कपाशीचें सूत कांतणाऱ्या हिंदी गिरण्या गुंतलेल्या आहेत. मे पूर्वी यावयाच्या सुताचा हिंदुस्थानांत वायदा न करण्याचें कांहीं दक्षिण हिंदुस्थानांतील गिरण्यांनीं ठरविलें आहे.

### मि. चेंबर्लेन ह्यांचा वाढदिवस

ग्रेट ब्रिटनचे मुख्य प्रधान, मि. चेंबर्लेन, ह्यांच्या जन्मास गेल्या आठवड्यांत ७१ वर्षें पुरीं झालीं. ह्या वयांतहि त्यांनीं अतिशय जबाबदारीचें काम अविश्रांतपणें चालविलें आहे.

### हिंदी आर्थिक सल्लागाराचे इंग्लंडमधील बातमीदार

हिंदी आर्थिक सल्लागार म्हणून डॉ. ग्रेगरी हे हिंदुस्थानांत काम करीत आहेत. ग्रेट ब्रिटनमधील सर्वसाधारण आर्थिक घडामोडींची हिंदी आर्थिक सल्लागारास माहिती देण्यासाठी इंग्लंडमध्यें एका स्त्रीची आर्थिक बातमीदार म्हणून नेमणूक करण्यांत आली आहे. तिला पगार दरमहा सुमारें ४५० रुपये मिळतो आणि तो ६५० रुपयांपर्यंत वाढावयाचा आहे.

### आगबोटी तयार करण्यास प्रोत्साहन

आगबोटी तयार करण्याच्या धंद्यास उत्तेजन देण्यासंबंधीं कांहीं योजनांचा हिंदुस्थान सरकार विचार करीत आहे, असें व्यापार खात्याचे प्रमुख सर ए. रामस्वामी मुदलियार यांनीं असेंब्लींत सांगितलें.

### फेडरल कोर्टांत अपील दाखल केलें

मुंबई शहरांतील मालमत्तेवर मुंबई सरकारनें बसविलेला कर बेकायदा आहे, कारण तो बसविण्याचा अधिकार प्रांतिक सरकारास नाहीं, अशी तक्रार सर बैरामजी जिजीभाई ह्यांनीं मुंबई हायकोर्टाकडे केली होती. हायकोर्टानें सर बैरामजींचा दावा काढून टाकला होता. त्यांचेतर्फे फेडरल कोर्टांत ता. १९ मार्च रोजीं अपील दाखल करण्यांत आलें.

### ट्रेझरी बिलांवर १ रु. १३ आ. व्याजाचा दर

हिंदी रिझर्व बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं १ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १ रु. १३ आ. इतका पडला.

### टेलिफोनच्या दरांत सवलत

ट्रंक टेलिफोनच्या पूर्ण दराचे एक तृतीयांश दरांत वर्तमानपत्रांच्या बातम्या रात्रीं १२ ते सकाळीं ६ पर्यंत सांगतां येतील, अशी व्यवस्था १ एप्रिल पासून करण्यांत आली आहे. कांहीं विशिष्ट नोंदलेल्या टेलिफोन नंबरांसच करण्यांत आलेल्या टेलिफोनला ही सवलत मिळेल. ६ मिनिटांचा आकार किमान द्यावा लागेल.

### हिन्दुस्थानांत येणाऱ्या पोलादावर नियंत्रण

हिंदुस्थानाकडे पाठविण्यांत यावयाच्या पोलादावर ग्रेट ब्रिटननें नियंत्रण घातलें आहे. उपलब्ध पोलादाचा दुरुपयोग होऊं नये परंतु आवश्यक व्यवहारांस तें मिळण्याची अडचण भासूं नये हा प्रस्तुत नियंत्रणाचा हेतु आहे.

### कंपन्यांचें एकत्रीकरण

दिल्ली येथील फेडरल इंडिया ॲशुअरन्स कं. लि. नें आपल्यामध्यें खालील ९ विमा कंपन्या समाविष्ट करून घेतल्या आहेतः– १ सेंट्रल लाइफ अँड जनरल (लाहोर), २ ग्रेट ओरिअंट (लाहोर), ३ युनिटी इन्शुअरन्स (लाहोर), ४ ग्लोरी ऑफ इंडिया (लाहोर), ५ हिंदुस्थान विमा (लाहोर), ६ जातीय कल्याण (कलकत्ता), ७ ग्रेट इंडिया (कलकत्ता), ८ प्रॉव्हिडंट इन्शुअरन्स (अलीगड), ९ नाग इन्शुअरन्स (नागपूर).

### बाळकृष्ण व्हिजिटेबल प्रॉडक्ट्स लि.

वरील कंपनी मुंबई येथें नोंदण्यांत आली आहे. तेल गाळण्याचा धंदा ती मुख्यतः करणार आहे. मेसर्स डी. व्ही. प्रधाने आणि कंपनीकडे मॅनेजिंग एजन्सी आहे.

### लंडन येथील वॉटर्लू पूल

लंडन येथील नवीन वॉटर्लू पुलाच्या बांधकामास १९३७ सालीं प्रारंभ झाला, परंतु त्याचें काम युद्धामुळें मंदगतीनें चालू आहे. येत्या वर्षी तें पुरें होईल अशी अपेक्षा आहे. युद्ध चालू असेपर्यंत सध्याचा तात्पुरता पूल वापरण्यासाठी कायम ठेवण्यांत येईल.

### जपानमधील २०० कोटि रेशमाचे किडे

जपानमधून दरसाल जेवढी रेशमाची निर्गत होते तेवढें रेशीम करण्यास २०० कोटि किडे लागतात. त्यांची तुतीच्या पानांवर वाढ करून रेशीम गोळा करण्याचा धंदा २० लक्ष जपानी कुटुंबें करीत आहेत. कोश करणारा प्रत्येक किडा आपल्या वजनाच्या ५० पट वजनाइतकीं तुतीचीं पानें खातो. ३ हजार कोशांपासून १ पौंड कच्चें रेशीम निघतें.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | १४६ | ६ जपानी आगपेट्या ... | १५० |
| २ मुंबई प्रांताचें अंदाजपत्रक | १४७ | ७ बनारस बँक लि. | १५१ |
| ३ स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार ... | १४८ | ८ ब्रिटिश बँका आणि युद्ध परिस्थिति ... | १५१ |
| ४ स्फुट-विचार ... | १४८ | ९ मुंबई प्रांताच्या हिशेबांतील कांहीं आकडे ... | १५१ |
| सर रॉजर लमले ह्यांचें भाषण—जपानशी हिंदुस्थानचा व्यापार—फिनॅन्स बिलाची चर्चा—विविध टीका व सूचना—जादा नफ्यावरील कराचें बिल मंजूर—निर्गत व्यापाराची आवश्यकता | | १० मुंबई-सिंध पब्लिक सर्व्हिस कमिशन ... | १५१ |
| | | ११ स्वराज्याची आर्थिक बाजू ... ... | १५२ |
| | | १२ विम्याचीं फसवणूक | १५४ |
| | | १३ जगनमर्धाल घटस्फोट | १५४ |
| ५ वधूंची शाळा ... | १५० | १४ निवडक बाजारभाव | १५५ |


# अर्थ

बुधवार, ता. १७ मार्च, १९४०

## मुंबई प्रांताचें अंदाजपत्रक

### १९३८–३९ चे पक्के हिशेब

मुंबई प्रांताचे माजी फडनवीस यांनीं फेब्रुवारी १९३९ मध्यें प्रांतिक विधिमंडळास १९३९–४० चें बजेट सादर केलें, त्या वेळीं १९३८–३९ च्या हिशेबांत ४४¾ लक्ष रुपयांची तूट पडेल अशी मूळ अपेक्षा होती तिचे ऐवजी ती ५६¾ लक्ष रुपये होईल, असा अंदाज त्यांनीं केला होता. परंतु, सरकारनें ५० लक्ष रुपये त्या वर्षी स्पेशल डेव्हलपमेंट फंडांत वर्ग केले, ते हिशेबांत धरले, तर तुटीची रकम ६¾ लक्ष रुपयेच होते. १९३८–३९ च्या पक्क्या हिशेबांत ५० लक्ष रुपये वरील फंडांत टाकल्यावर ३५ लक्ष रुपयांची तूट दिसते. ही फंडांतील रकम हिशेबांत घेतली, तर वास्तविक १५ लक्ष रुपयांचा वाढावाच उरलेला आढळून येतो. अंदाजपत्रकांतील अपेक्षेपेक्षा मुंबई सरकारास २३ लक्ष रुपये उत्पन्न अधिक झालें आणि खर्च ३६ लक्ष रुपये कमी झाला, ह्यामुळेंच हें शक्य झालें. मूळ ४४ लक्षांच्या तुटीच्या अपेक्षेचे मानानें एकूण ५९½ लक्ष रुपयांनीं प्रांताची परिस्थिति सुधारली, हें ह्यावरून दिसून येतें. ह्या वर्षी जमीन महसुलाचे १५ लक्ष रुपये अधिक मिळाले, मध्यवर्ती सरकाराकडून प्राप्तीवरील कराबाबत ५ लक्ष रुपये ज्यास्त मिळाले, करमणुकीवरील करानें ७ लक्ष रुपये अधिक दिले, परंतु एक्साइजचे उत्पन्न ८ लाखांनीं घटलें. इरिगेशन खात्याचा खर्च अपेक्षेपेक्षा १५ लाखांनीं कमी झाला आणि शिक्षण, आरोग्य व उद्योगधंदे ह्यांसंबंधींतील योजनांवरील खर्चास नीट प्रारंभ न झाल्यामुळें त्यांत १९ लाखांची बचत झाली.

### १९३९–४० चें अंदाजपत्रक

१९३९–४० च्या अंदाजपत्रकांत फडनविसांनीं २८½ लक्ष रुपयांची तूट दाखविली होती आणि ती वर्षारंभीच्या शिलकेंतून भागेल असें ते म्हणाले होते. कॉंग्रेस मंत्रिमंडळानें सुरू केलेल्या योजनांची प्रगति अपेक्षेप्रमाणें झाली तर वर्षअखेर आणखी २२ लक्ष रुपये कमी पडतील असा अंदाज नंतर कांहीं महिन्यांनीं करण्यांत आला होता. १९३९-४० च्या दुरुस्त अंदाजाप्रमाणें ह्या वर्षअखेर १९¾ लक्ष रुपयांचा वाढावा राहील, असें दिसतें. हिंदुस्थान सरकाराकडून मुंबई प्रांतिक सरकारास नीमायर योजनेस अनुसरून ३२¾ लक्ष रुपयांचा प्राप्तीवरील करांतील वाटा मिळेल असें बजेटांत गृहीत धरलें होतें; परंतु तें उत्पन्न चालू वर्षी ५२ लाखांहून अधिक झालें आहे. ग्रामोद्योगावर सरकार ४५ लक्ष रुपये खर्चणार होतें, त्यांत फार मोठी बचत झालेली आहे. कारण कॉंग्रेस मंत्रिमंडळाच्या योजना तयार होऊन प्रत्यक्ष अमलांत यावयास थोडा वेळ लागला. दारूबंदीमुळें सरकारचें होणारें १७५ लक्ष रुपयांचें नुकसान, जमीन महसुलाच्या दुरुस्त आकारणीमुळें येणारी ४० लक्षांची तूट, खेडेगांवीं सुधारणेसाठी करावयाचा ५५ लाखांचा नवीन खर्च, इत्यादींच्या तरतुदीसाठीं सरकारनें मुंबई व अहमदाबाद ह्या शहरांतील मालमत्तेवर कर बसविला, गिरणीचे कापडाचे विक्रीवर कर लादला, पेट्रोलच्या विक्रीवर दर गॅलनला १ आण्याची पट्टी चढवली आणि विजेवरील कर वाढवला. अशा रीतीनें १९३९–४० चें फिनॅन्स बिल वैशिष्ट्यपूर्ण होतें. त्यांतील करवाढ अजून लोकांच्या अंगवळणी पडलेली नाहीं.

### येत्या वर्षाचें बजेट

मुंबई प्रांतांत सध्या लोकमतानुवर्ती प्रधानमंडळ कारभार चालवीत नसून, गव्हर्नर हेच आपल्या सल्लागारांच्या सहाय्यानें राज्य चालवीत आहेत. त्यांनीं मंजूर केलेलें १९४०–४१ चें अंदाजपत्रक प्रसिद्ध झालें आहे. माजी प्रधान मंडळानें आखलेल्या कार्यक्रमांत बदल न करण्याचें त्यांचें धोरण असल्या कारणानें त्यांनीं दारुबंदीच्या क्षेत्रांत वाढ केली नाहीं तरी आहे तेवढी बंदी त्यांनीं कायम ठेवली आहे. अर्थातच, त्यामुळें येणारें नुकसान भरून आणणारे कर चालू ठेवणें त्यांस भागच होतें. ह्यासाठी, गव्हर्नरांनीं मुंबई फिनॅन्स ॲक्टाची मर्यादा आणखी एका वर्षानें वाढविली आहे. येत्या वर्षी उत्पन्न १२ कोटि, ८२ लक्ष, ८८ हजार रुपये होऊन खर्च १२ कोटि, ८२ लक्ष, ४० हजार होईल आणि ४८ हजारांचा वाढावा उरेल, अशी अपेक्षा आहे. प्राप्तीवरील कराच्या उत्पन्नाचे ६० लक्ष रुपये, म्हणजे चालू वर्षाच्या मूळ अंदाजापेक्षा ३० लक्ष रुपये अधिक मिळतील असा अजमास आहे. १९४०–४१ मध्यें भांडवली स्वरुपाचा खर्च १२½ लक्ष रुपये होईल. तो सर्व बाकी शिलकी रकमांतून होईल. प्रांतिक रोड फंडांतून १६½ लक्ष रुपये खर्च करण्याचा विचार आहे. स्पेशल डेव्हलपमेंट फंडांत २५ लक्ष रुपये टाकण्यांत येतील आणि फंडांतून २७½ लक्ष रुपये खर्चण्यांत येतील. मूळ ५० लाखांतून चालू वर्षांतील खर्चाचे १९ लक्ष रुपये उणे केले आणि त्यांत हे नवीन २५ लक्ष रुपये मिळविले, म्हणजे एकूण ५६ लक्ष रुपये होतील. मात्र, त्यामुळें १९३९–४० चे बजेटांतील अपेक्षित १९¾ लक्ष रुपयांचा वाढावा जाऊन त्याऐवजीं ५½ लक्ष रुपयांची तूट दिसूं लागेल. वरील माहितीवरून असें दिसून येईल कीं, राज्यकारभाराचा गाडा पूर्ववत् चालू ठेवण्यापलीकडे सरकारनें नवीन कांहींहि केलेलें नाहीं. अर्थात्, त्यांत अनपेक्षित कांहींच नव्हतें. उलट, पूर्वीच्या मंत्रिमंडळानें हातीं घेतलेल्या योजना रद्द करणें हेंच श्रेयस्कर झालें नसतें. राज्यकारभार तत्त्वतः पूर्वीहि गव्हर्नरच पहात असत आणि आतांहि तच बघत आहेत. लोकमतानुवर्ती मंत्रिमंडळाऐवजी सल्लागार आले, एवढाच काय तो फरक. जुन्या मंत्रिमंडळाचे जागीं नवीन मंत्रिमंडळ आलें असतें आणि त्यांनीं सरकारी धोरण बदललें असतें तर तें शासनपद्धतीच्या तत्वास धरून झालें असतें. चालू योजना

रद्द करण्याची जबाबदारी स्वतःवर गव्हर्नरांनीं घेतली नाहीं, हें योग्यच झालें. प्रांतिक बजेटाची तोंडमिळवणी होऊं शकली नसती, तर त्यांनीं काय केलें असतें, करवाढ केली असती का दारूबंदी कमी केली असती, असा प्रश्न कोणी विचारला तरी तो प्रत्यक्ष उद्भवला नसल्याकारणानें त्याचा विचार करण्याचें आज प्रयोजन नाहीं. गव्हर्नरांनीं मंजूर केलेलें बजेट आहे ह्या परिस्थितींत समाधानकारच समजलें जाईल.

## मुंबई प्रांतांतील स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार

### ऑडिटर जनरलचा रिपोर्ट
### ( १९३८-३९ )

( १ ) अहमदाबाद, पुणें शहर आणि सोलापूर येथील म्युनिसिपॅलिट्या सोडल्या तर बाकी बहुतेक म्युनिसिपॅलिट्यांची आर्थिक परिस्थिति समाधानकारक नाहीं आणि करवसुलींतील दिरंगाईमुळें ती अधिकच बिघडत चालली आहे.

( २ ) विशेषतः आठ म्युनिसिपॅलिट्यांच्या कारभाराकडे सरकारनें सत्वर लक्ष पुरविलें पाहिजे. धारवाड, हुबळी, भडोच, विजापूर, अथणी, त्र्यंबक, जेजुरी आणि रांदेर ह्या त्या म्युनिसिपॅलिट्या होत. ( हुबळी येथील म्युनिसिपॅलिटीचा कारभार सरकारनें आतां स्वतःकडे घेतला आहे. )

( ३ ) जिल्हा लोकलबोर्डांची परिस्थिति बिघडत चालली असली तरी ती साधारणपणें म्युनिसिपॅलिट्यांपेक्षा बरी आहे. दक्षिण विभागांतील सर्व बोर्डे, मध्यविभागांतील बहुतेक बोर्डे आणि उत्तर विभागांतील ठाणें जिल्हा लोकलबोर्ड ह्यांची परिस्थिति अत्यंत वाईट आहे.

( ४ ) वेगळ्या काढून ठेवलेल्या फंडांचा विनियोग चालू खर्चाकडे करणें, कलेक्टरांच्या सूचनांकडे दुर्लक्ष करणें, उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न न करणें, करवसुलीची शिकस्त न करणें, खर्चाच्या कार्यक्रमावर लक्ष न ठेवणें इत्यादि दोष ढोबळपणें दिसून येतात.

( ५ ) नागरिकांनीं द्यावयाच्या करांचीं बिलें तयार करण्यांत म्युनिसिपॅलिट्या दिरंगाई करतात, त्यामुळें बिलें उशीरा पाठविलीं जातात. अर्थातच, त्यांची वसुलीहि लांबणीवर पडते. वसुलीसाठी कायद्यानें दिलेले अधिकार त्या पूर्णपणें उपयोगांत आणीत नाहींत त्यामुळें थकबाकी वाढत जाते. कांहीं म्युनिसिपल मेहेरबानांची बाकी ७ हजारांवर असलेली आढळली !

( ६ ) ४६ म्युनिसिपॅलिट्यांत थकबाकीचें एकूण येण्याशी प्रमाण २०% अगर अधिक पडतें. त्यांतील २१ म्युनिसिपॅलिट्यांत तें ४०% अगर अधिक आणि ७ म्युनिसिपॅलिट्यांत ६०% अगर अधिक आहे. होनावर व अशा म्युनिसिपॅलिट्यांत तें ८०% पेक्षा अधिक आहे. अक्याचा कारभार मामलेदाराकडे सोपविल्यापासून परिस्थिति सुधारली आहे.

( ७ ) महाबळेश्वर, आळंदी व खेड येथें थकबाकी नाहीं. विटें आणि वाई येथें ती १% पेक्षा कमी आणि दापोली येथें १·३% आहे.

( ८ ) प्रॉव्हिडंड फंडांतील रकमा हे ट्रस्ट फंड आहेत, ह्या विषयीं पुनः पुनः सांगितलें तरी कित्येक म्युनिसिपॅलिट्या व लोकलबोर्डे प्रॉव्हिडंड फंडाच्या नियमांचे विरुद्ध पैसे गुंतवितात. ह्या बाबतींत पुणें शहर म्युनिसिपॅलिटीचें नांव आहे.

## स्फुट विचार

### सर रॉजर लमले ह्यांचें भाषण

मुंबई युरोपिअन चेंबर ऑफ कॉमर्सच्या वार्षिक सभेचे प्रसंगीं ह्या प्रांताचे गव्हर्नर, सर रॉजर लमले, ह्यांनीं केलेल्या भाषणांतील कांहीं महत्त्वाच्या मुद्यांचा उल्लेख येथें करणें आवश्यक आहे. युरोपांत चाललेल्या युद्धाच्या विस्तृत व गंभीर स्वरूपाचा निर्देश करून त्यांत यश मिळण्यासाठी सर्व प्रकारांच्या मालाचें उत्पादन व पुरवठा भरपूर होईल अशी व्यवस्था करण्याचें महत्त्व त्यांनीं प्रतिपादलें. "युद्ध तर वाईटच; पण त्यामधून हिंदुस्थानचे उद्योगधंदे व व्यापार ह्यांस कायमच्या स्वरूपाचें सहाय प्राप्त व्हावें" अशी आशा सर रॉजर ह्यांनीं प्रदर्शित केली आणि युद्ध आपणांस पूर्णपणें यशस्वी होण्याकरितां सर्वांनीं स्वार्थत्याग करणें अगत्याचें आहे असें सांगितलें. लोकांस जबाबदार असलेल्या प्रधानमंडळाच्या अभावीं राज्यकारभाराचा सर्व बोजा आपल्या शिरावर पडला असून प्रांतिक अंदाजपत्रकांत पूर्वीच्या मंत्रिमंडळाचें धोरण चालू ठेवलें आहे ही गोष्ट त्यांनीं श्रोत्यांच्या नजरेस आणली. कर कमी करणें किंवा सार्वजनिक उपयोगाच्या बाबींवर अधिक खर्च करणें हें शक्य झालें नसून त्या बाबतींत होणाऱ्या अनेक सूचनांचा स्वीकार करतां आला नाहीं ह्या विषयीं त्यांनीं खेद व्यक्त केला. पुढें येणाऱ्या प्रधानमंडळाची परिस्थिति अडचणींची होऊं नये ह्या उद्देशानें आपण महत्त्वाचे फेरबदल कोणतेच करावयाचे नाहींत असें ठरविलें असल्याचें गव्हर्नर साहेबांनीं सांगितलें. कपाशीच्या बाजारांतील वायद्याचे आणि ऑपशन्सचे व्यवहार नियंत्रित करण्याबाबत वादग्रस्त प्रश्न उपस्थित झाले आहेत, त्यांचा त्यांनीं निर्देश केला. त्यांपैकीं पहिली बाब व्यापक स्वरूपाची असून तिचा निकाल प्रांतिक सरकारनें करणें कठीण आहे, पण दुसऱ्या बाबीच्या संबंधांत निर्बंधाचा कायदा करण्यांत आला आहे असें त्यांनीं सांगितलें.

### जपानशी हिंदुस्थानचा व्यापार

जपानशीं व्हावयाच्या हिंदुस्थानच्या व्यापारी कराराविषयीं वाटाघाटींत गेले पांच-सहा आठवडे खंड पडला होता. त्या लवकरच पुन्हा चालू होणार असल्याचें समजतें. हिंदुस्थान व जपान ह्यांचेमध्यें कापूस व कापड ह्यांची देवघेव कोणत्या प्रमाणांत व्हावी हा चर्चेचा व मतभेदाचा मुख्य प्रश्न आहे आणि ह्या बाबतींत जपानच्या वतीनें पुढें मांडण्यांत आलेल्या सूचनांचा विचार हिंदुस्थान सरकारनें पुरा केला असून त्यावर बोलणीं आतां होणार आहेत. हिंदी सरकारचा व्यापारी प्रतिनिधी जपानमध्यें आहे. त्यानें १९३८–३९ सालाबाबत रिपोर्ट केला आहे त्यावरून असें दिसतें कीं मायका व लोखंड ह्यांची हिंदुस्थानांतून त्या देशांत निर्गत अधिक झाली. ह्या दोन्ही धातू युद्धोपयोगी आहेत हें ह्या वाढीचें कारण आहे. १९३७ सालीं हिंदुस्थाननें जपानी माल आयात केला, त्यापेक्षा जपानला अधिक माल पाठवला. पण १९३८ मध्यें हें पारडें उलटलें. परराष्ट्रीय माल शक्यतोंवर खरेदी करावयाचा नाहीं, ह्या प्रकारचें जपानचें धोरण या परिस्थितीच्या मुळाशीं आहे. हिंदी कातड्यांच्या निर्गत व्यापारांत फारच मोठी घट झाली आणि जपाननें त्या मालाची खरेदी अमेरिकन बाजारांत केली. चीनमध्यें जपानचें युद्ध चाललें आहे, त्यामुळें जपानी सरकारनें

हिन्दी मालाची आयात नियंत्रित केली आहे. जपाननें १९३७ सालीं एकूण जेवढा कापूस परदेशांतून घेतला त्यापैकी सुमारें ४३ टक्के कापूस हिंदुस्थानचा होता. १९३८ मध्यें हें प्रमाण २६टक्क्यांवर खाली आलें. १९३९ च्या प्रारंभाच्या महिन्यांत हिन्दी कापसाची निर्गत थोडीशी सुधारली. हिंदुस्थानचा जपानशीं होणारा व्यापार जपानी सरकारनें चीनमध्यें आखलेल्या आर्थिक धोरणावर अवलंबून आहे. चीन देशांत आपलें औद्योगिक व व्यापारी वर्चस्व स्थापण्याचा जपानचा प्रयत्न चालू आहे आणि त्यास अनुसरून हिंदुस्थान व जपान ह्यांचेमधील व्यापार निश्चित होणें अपरिहार्य झालें आहे.

---

### फिनॅन्स बिलाची चर्चा—विविध टीका व सूचना

- सरकारी उत्पन्नासाठी जे निरनिराळे कर बसवलेले असतात, त्यांचा अंतर्भाव दरवर्षी एका स्वतंत्र बिलांत करण्यांत येतो आणि तें बिल मंजूर झालें म्हणजे करवसूलीचा कायदेशीर अधिकार सरकारास प्राप्त होतो: मध्यवर्ती असेंब्लींत ह्या प्रकारचें बिल सरकाराचे तर्फेनें पुढें मोडण्यांत आलें. त्याच्या चर्चेंत मामुली वहिवाटीस अनुसरून सभासदांनीं विविध प्रश्नांवर मत व्यक्त करून सरकारच्या धोरणावर टीका केली. त्या प्रसंगीं सभासदांस “ चीन ते पेरू ” पर्यंत विस्तृत क्षेत्रांत हिंडून राज्यकारभाराच्या वाटेल त्या अंगाचा समाचार घेतां येतो. आपल्या खास विशिष्ट तक्रारीस सभासद वेशीवर टांगतात. हिन्दी ख्रिस्ती समाजास सरकारी नोकऱ्यांमध्यें योग्य स्थान मिळत नाहीं अशी एकानें तक्रार केली. साखर व पेट्रोल ह्यांवर जादा कर बसवण्यापूर्वी सरकारनें उत्पन्न वाढवण्याचे दुसरे मार्ग कां शोधले नाहींत असा दुसऱ्यानें प्रश्न विचारला. विलावरील कर वाढवून कराचें ओझें सर्व वर्गांवर टाकण्याचें व चेक्सवर स्टँप ड्यूटी बसवण्याचें धोरण सरकारनें स्वीकारावयास हवें होतें असें तिसऱ्यानें सुचविलें आणि राष्ट्राच्या शरीरसामर्थ्याची जोपासना करण्याचा पद्धतशीर प्रयत्न होण्याचें महत्त्व प्रतिपादिलें. चौथ्यानें राजकीय परिस्थितीचा उल्लेख करून सरकारनें कॉंग्रेसच्या मागणीस मान्यता देणें योग्य आहे असें सांगितलें. पांचव्यानें कस्टम्सच्या उत्पन्नाचे ताजे आकडे देऊन त्यांवरून जादा कर बसवण्याची सरकारास आवश्यकता नाहीं असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. सहाव्यानें हिंदी साखरेच्या धंद्याची परिस्थिति, उत्पादन, खप, बाजारभाव इत्यादि बाबतींत घोटाळ्याची झाली असल्याचें सांगून तिची घडी नीट बसवली जाण्यासाठी सर्व हितसंबंधीयांच्या प्रतिनिधींची कमिटी सरकारनें नेमावी असें सुचविलें. सातव्यानें हिंदुस्थान सरकारच्या खर्चाचें नियमन झालें पाहिजे आणि निरानिराळ्या खात्यांच्या कारभारामध्यें एकसूत्रीपणा निर्माण होणें अगत्याचें आहे असें मत व्यक्त केलें.

---

### जादा नफ्यावरील कराचें बिल असेंब्लींत मंजूर

स्वदेशी धंद्यांच्या स्थैर्याच्या व प्रगतीच्या दृष्टीनें जादा नफ्यावरील करास सध्याची परिस्थिति व वेळ हीं अनुकूल नाहींत हा त्या कराविरुद्ध मुख्य आक्षेप आहे. जादा नफ्यावरील कराच्या बिलाचें तिसरें वाचन मध्यवर्ती असेंब्लींत मंजूर होतेवेळीं हा आक्षेप स्पष्टपणानें व्यक्त करण्यांत आला. तथापि त्यास बहुमताचा पाठिंबा नसल्याकारणानें बिलाच्या चर्चेच्या वेळीं त्यांत करण्यांत आलेल्या सुधारणांविषयीं असेंब्लीच्या सभासदांस समाधान मानून स्वस्थ बसणें प्राप्त झालें. करास पात्र असलेल्या नफ्याची मर्यादा ३६ हजारांपर्यंत आतां चढवण्यांत आली असून विशिष्ट मंडळ्यांच्या फायद्यास माफी देण्यांत आली आहे, ह्या सुधारणा बिलांत झाल्या आहेत. सर जरेमी रेसमान ह्यांनीं नफ्यावरील कराचें समर्थन केलें तें मनोरंजक आहे. युद्ध चालू असतांना त्याच्या खर्चासाठी आपल्या फायद्यांतील मोठा अंश सरकारी तिजोरींत आज नाहीं उद्यां जाणार ही गोष्ट धंदेवाल्या लोकांस वेळींच कळणें आवश्यक होते असें त्यांचें नवीन कराचें समर्थन आहे. असला कर आपणांस द्यावा लागेल ही गोष्ट धंदेवाल्यांस समजली नसती तर आपला कार्यक्रम आखण्याच्या मार्गांत त्यांस अडचण भासली असती. त्यांनीं भलत्याच समजुतीनें आपल्या उद्योगाच्या विस्ताराची आखणी केली असती आणि नफ्यावरील कराची मागणी अचानक येऊन त्यांचा गोंधळ उडाला असता. ह्या कोटिक्रमानें जादा नफ्यावरील कराचें कसें समर्थन होतें, हें समजणें कठीण आहे. शिवाय, ह्या कराची आकारणी निरनिराळ्या धंद्यांस अन्यायकारक व जाचक होणार नाहीं, ह्याविषयीं निःशंकपणा वाटणें शक्य दिसत नाहीं. नवे धंदे आणि विशेषतः युद्धोपयोगी धंदे ह्यांचें नुकसान होणार नाहीं ह्याविषयीं खबरदारी घेण्याचें आश्वासन फडनवीसांनीं दिलें आहे. पण सध्या अस्तित्वांत असलेल्या धंद्यांस मजबुती येण्याच्या दृष्टीनें नवीन कराच्या कायद्याची अंमलबजावणी सहानुभूतीनें होणें अगत्याचें आहे. ह्या संबंधांतहि सरकारचें आश्वासन आवश्यक आहे आणि त्या बाबतींत युरोपियन सभासदांचे असेंब्लींतले पुढारी, मि. ऐक्मन, ह्यांनींहि चिंता प्रकट केली आहे. करास पात्र असलेल्या व्यक्ती व मंडळ्या ह्यांच्यावर नवीन बोजा किती व कसा पडेल हें सांगतां येणें अवघड आहे आणि त्यावर उद्योगधंद्यांचें भवितव्य अवलंबून राहील असें ते म्हणाले. असेंब्लींत झालेली चर्चा व व्यक्त करण्यांत आलेलीं मतें लक्षांत घेतां, जादा नफ्यावरील कराचें औचित्य आणि व्यावहारिकता हीं सिद्ध झालीं आहेत असें म्हणतां येत नाहीं.

---

### ब्रिटिश बँकर्सचा वार्षिक आढावा

डिसेंबर अखेर हिशेबाचें वर्ष संपल्यावर महिन्या–दीड महिन्यांचे आंत ब्रिटिश बँकांच्या वार्षिक सभा भरतात, त्यावेळीं त्यांचे अध्यक्ष आपल्या भाषणांत देशाच्या एकंदर आर्थिक परिस्थितीचा आढावा घेतात. गेल्या वर्षीच्या वार्षिक सभांचे वेळचे भाषणांत खुला व्यापार पुनः प्रस्थापित होण्याची आणि हुंडणावळीवरील बंधनें दूर होण्याची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादन केली होती. आजच्या युद्धाची पडछाया आणि तीमुळें राष्ट्रीय संपत्तीचा शस्त्रास्त्रांच्या उत्पादनाकडे होणारा अपव्यय ह्यांपासून मोकळीक कशी होईल ह्याची चिंता मागील वर्षीं त्यांस वाटत होती. आतां प्रत्यक्ष युद्ध सुरू झालें आहे, तें जिंकण्यासाठी आणि मागाहून प्रस्थापित होणारी शांतता चिरस्थाई करण्यासाठी ब्रिटिश निर्गत व्यापार वाढविला पाहिजे, असा सूर सर्व बँकर्सच्या भाषणांतून यंदा निघाला. परराष्ट्रीय व्यापाराचें नियंत्रण करणें इष्ट असलें, तरी त्यामुळें मालाच्या ये-जास शक्य तेवढा उपद्रव कमी व्हावा, अशी इच्छा त्यांनीं व्यक्त केली. युद्ध काळांत अवलंबिण्याचें आर्थिक धोरण, निर्गत व्यापार वाढविण्याची आवश्यकता, मालाच्या अंतर्गत उठावांत बचत करण्याची जरूरी, पैसे शिल्लक टाकण्याचें महत्त्व, आर्थिक बाबतींत सरकारी नियंत्रण, ह्या सर्व प्रश्नांवर बँकांच्या अध्यक्षांचें ऐकमत्य आढळलें. शेतीच्या धंद्याच्या वाढीची आवश्यकता कशी आहे ह्याचेंहि एका बँकरनें विवेचन केलें. “ अर्थ ” मध्यें सात प्रमुख बँकर्सच्या भाषणांतील महत्त्वाचे मुद्दे गेल्या दोन आठवड्यांत सारांश रूपानें देण्यांत आले आहेत. त्याचें वाचन हिंदुस्थानांतील परिस्थितींतहि मार्गदर्शक होण्यासारखें आहे.

---

### लायक वधू तयार करण्याची शाळा

टोकिओ शहराच्या एका उपनगरांत मिसेस टोयो होंडा ह्या बाईनें वधू तयार करण्याची एक शाळा चालविली आहे. वैवाहिक आयुष्यक्रम यशस्वी करण्यास लागणाऱ्या आवश्यक गोष्टी ह्या शाळेंत शिकविल्या जातात. अभ्यासक्रम एक वर्षाचा आहे. गेल्या वर्षी शाळेंतील ५० मुलींचे ह्या प्रकारानें विवाह झाले त्यांपैकीं ३० मुलींस आपल्या पतींबरोबर मँच्युक्युओमध्यें जावें लागलें. आपला देश सोडून दूर ठिकाणीं जाऊन राहिलेल्या जपानी लोकांशीं सुखानें संसार कसा करतां येईल, ह्याची माहिती मिसेस होंडा ह्या देतात. शाळेंतील अभ्यासक्रमांत पाकशास्त्रास विशेष महत्त्व आहे. शिवणकाम, आरोग्यशास्त्र, मुलांची जोपासना करण्याचें शास्त्र, इत्यादि आवश्यक गोष्टींबरोबरच आयुष्यक्रमांत गोडी आणणाऱ्या बोलण्याचालण्याची पद्धत, पिआनो वादन, नर्तन, फुलांची मांडणावळ इत्यादि बाबीहि शाळेंत शिकविल्या जातात. आयुष्यास मार्गदर्शक अशा नीतितत्त्वांचाहि मुलींस परिचय करून दिला जातो. चिनी भाषेचें शिक्षण ह्यापुढें त्या शाळेंत आवश्यक केलें जाणार आहे. शाळेंतील मुलींपैकी ज्यांचें सासर मँच्युक्युओमध्यें आहे, अशा सर्वांचे विवाह सुखाचे झाले आहेत, असा अनुभव आहे. मँच्युक्युओमधील परिस्थितीचें सूक्ष्म अवलोकन तेथें प्रत्यक्ष जाऊन मिसेस होंडानीं केलें असल्यामुळें त्यांच्या शब्दावर मुलींचा सहाजीकच विश्वास बसतो. विवाहास तयार असणाऱ्या मुलांपैकी दोन तृतीयांश तरी मुलींच्या अपेक्षांचेपेक्षा कमी प्रतीचे ठरतात, असें त्यांस आढळलें आहे.

---

### जपानी आगपेट्या

आगपेट्यांचें उत्पादन करणाऱ्या देशांत जपानचा अनुक्रम तिसरा लागतो. स्वीडन आणि रशिया ह्यांचा अनुक्रम जपानचे वर आहे. आगपेट्या तयार करणाऱ्या जपानमध्यें पांच प्रमुख कंपन्या आहेत. १९२१–२५ ह्या मुदतींत जपानी आगपेट्यांची निर्गत अतिशय मोठ्या प्रमाणावर झाली. १९३१–३२ मध्यें ह्या चलतीस आळा बसला. १९३३–३४ नंतर निर्गतीस पुनः चालना मिळाली आणि अमेरिकेकडेहि माल जाऊं लागला. लवकरच अमेरिकेनें जपानी आगपेट्यांवर जकाती बसविल्या. चीन देशांत जपानी मालावर बहिष्कार घालण्याची मधून मधून खटपट चालू असली तरी जपानचें बस्तान तेथें आतां नीट बसलें आहे. कच्च्या मालाचा पुरवठा आतां जरा महाग झाला असल्याकारणानें जपानमधील आगपेट्यांचें उत्पादन थोडें मंदावलें आहे. जपानी आगपेट्यांच्या निर्गतीचे आकडे खाली दिले आहेतः—

| वर्ष | हजार ग्रोस |
|---|---|
| १९२९ | २१८ |
| १९३१ | २२३ |
| १९३२ | १३६ |
| १९३५ | ५१४ |
| १९३८ | ५१९ |

जपानी आगपेट्यांची निर्गत मुख्यतः चीन, कॅनटोंग, फिलिफाइन्स, हाँगकाँग, स्ट्रेट्स सेटलमेंट्स, अमेरिका, ब्रिटिश हिंदुस्थान ह्या देशांकडे होते.

---


## धी बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना—७ सप्टेंबर १९०६ ]

| | |
|---|---|
| जमारलेलें भांडवल ... ... ... | रु. २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. १,१३,००,००० |

मुख्य कचेरी—ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

शाखा—बुलियन एक्सचेंज ( शेख मेमन स्ट्रीट, मुंबई ), बांद्रे ( मुंबईनजीक ), मलबार हिल ( मुंबई ), कुलाबा ( मुंबई ), काळबादेवी, ( मुंबई ), अहमदाबाद, अहमदाबाद–स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता-बडाबझार, चौरंघी स्क्वेअर ब्रँच, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी, नागपूर ( किंग्जवे ), जमशेदपूर

लंडन एजन्ट्स—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

चालू ठेवींवरील व्याजाचा दर

जानेवारी ते डिसेंबर अखेर दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेकडा ½ टक्का व्याज दिलें जाईल, परंतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं. कायम थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी सुद्धां आम्ही ठेवून घेतों, व त्यांवर व्याजाची योग्य आकारणी करतों; विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत.

शिवाय, ट्रस्टी, या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लागल्यास तींसुद्धां ही बँक करते. नियमांची माहिती अर्जानें मागवावी. शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

एजंट—टी. आर. लालवाणी.



## दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड.

### लक्ष्मीरोड, पुणें शहर.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल.........रु. | १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल ...रु. | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल .........रु. | २,०६,१५० |
| वसूल झालेलें भांडवल...रु. | १,५२,९७५ |

### शाखा

अेक्झॅमिनर प्रेस बिल्डिंग, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

### डायरेक्टर्स

प्रो. व्ही. जी. काळे, चेअरमन, श्री. डी. के. साठे, व्हा. चेअरमन, श्री. एल. जी. पवार, श्री. टी. व्ही. रावडे, श्री. व्ही. पी. बर्वे, श्री. एम. आर. जोशी, श्री. एस. जी. मराठे, श्री. आर. सी. सोहोनी, श्री. एफ. डी. पदमजी.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक काढतां येतात.

बँकेचे नियम व व्याजाचे दर व शेअरबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

एम. व्ही. भोसले, मॅनेजर.

## बनारस बँक लि. गुंडाळण्यांत येणार

(ही बँक ४ मे रोजीं बंद झाली. तिची स्थापना ३५ वर्षांपूर्वी झालेली होती.)

बनारस बँक लि. ही बंद पडल्यानंतर तिला कंपनी कायद्यांतील १५३ व्या कलमाचा फायदा मिळावा, असा तिचेतर्फे अलाहाबाद हायकोर्टाकडे अर्ज करण्यांत आला होता. कंपनी आणि तिचे घेणेकरी ह्यांमध्यें एकादी परस्परांस मान्य अशी देण्या-घेण्याची व्यवस्था होत असेल तर तिला अवसर मिळावा आणि तीन-चतुर्थांश घेणेकऱ्यांच्या संमतीनें जर एकादी योजना झाली आणि तिला कोर्टानें संमति दिली तर ती योजना सर्व घेणेकऱ्यांवर बंधनकारक व्हावी, अशी ह्या कलमांत तरतूद आहे. तिचा फायदा मिळविण्यासाठी कोर्टाकडे अर्ज आला असल्यास, अर्जाचा निकाल लागेपर्यंत कंपनीविरुद्ध चालू असलेल्या अगर तिचेविरुद्ध लागलेल्या नवीन दाव्यांचा विचार तहकूब व्हावा असा हुकूम कोर्टास देतां येतो. ही सवलत बनारस बँक लि. ला पाहिजे होती. "दिवाळखोर बँकिंग कंपनीनें, चांगले दिवस तात्काळ येण्याचा संभव दिसत नसतांना, आपला व्यवहार चालू ठेवणें आणि कोर्टानें मान्य केलेल्या योजनेचा फायदा घेऊन आणखी ठेवी मिळवणें हें मला युक्त दिसत नाहीं" असें आपलें मत अलाहाबाद हायकोर्टाचे न्यायमूर्ति मि. ब्रॅंड ह्यांनीं व्यक्त करून बँक गुंडाळण्यांत यावी असा निवाडा केला व श्री. इंदुभूषण बानर्जी ह्यांस तात्पुरते लिक्विडेटर नेमलें. कंपनीच्या बहुसंख्य घेणेकऱ्यांचें मत कोर्टानें विचारांत घ्यावें, असें कायदा आणि पद्धत हीं सांगतात, परंतु प्रस्तुत प्रकरणांत त्यांनीं सुचविलेली व्यवस्था मान्य करतां येत नाहीं, असें ते म्हणाले.

### रिझर्व्ह बँक कायद्यांतील कलमावर न्यायमूर्तींचा अभिप्राय

"रिझर्व्ह बँकेच्या ॲक्टाच्या ४२ व्या कलमानुसार प्रत्येक शेड्यूल्ड बँकेस ठेवींचे आपल्या विशिष्ट प्रमाणांत रिझर्व्ह बँकेजवळ रकमा ठेवाव्याच लागतात. त्या ठेवण्यास बँक चुकली, तर तिला दंडादाखल व्याज भरावें लागतें. शेड्यूल्ड बँकेस, रिझर्व्ह बँकेकडे रकम ठेवावी कीं दंडादाखल व्याज भरावें, हें ठरविण्याचा अधिकार आहे, असा बनारस बँकेनें ह्याचा अर्थ केला. अडचणींत आलेल्या बँकेस कायद्यांतून अशी पळवाट काढतां यावी हा रिझर्व्ह बँक कायद्याचा हेतु असणें शक्य नाहीं. तथापि, ती पळवाट आज कायदेशीरपणें काढतां येते. वस्तुतः कायद्यांतील बंधनें टाळण्याचाच तो प्रकार आहे." अशा अर्थाची रिझर्व्ह बँक ॲक्टावर आणि बनारस बँकेच्या व्यवहारावर न्यायमूर्तींनीं टीका केली.

## ब्रिटिश बँका आणि युद्ध परिस्थिति

### वार्षिक सभांतील भाषणें

नॅशनल प्रॉव्हिन्शिअल बँक लि. चे अध्यक्ष, मि. कॉलिन एफ्. कँबेल हे आपल्या भाषणांत म्हणाले:—

"ग्रेटब्रिटनचें जीवन परराष्ट्रीय व्यापारावर अवलंबून आहे आणि ही गोष्ट आजच्या परिस्थितींत तर फारच महत्त्वाची आहे. ग्रेट ब्रिटन, ब्रिटिश साम्राज्य आणि फ्रान्स ह्यांमधील सहकार्यामुळें आणि शत्रुपक्षीयांविरुद्ध सर्व जगाचें मत झालेलें असल्यामुळें, १९१४-१८ चे मानानें आतां आपणांस आपला व्यापार वाढविण्यास अतिशय उत्कृष्ट संधी लाभलेली आहे. मालाच्या किंमतींत वाढ होऊं न देण्याचें महत्त्व ह्या संबंधांत विशेष आहे आणि त्यासाठीच सरकार किंमती स्थिर राखण्याचा प्रयत्न करीत आहे. कर्ज उभारण्यापेक्षा काटकसर घडवून आणणें आणि जिनसा वायां जाऊं न देणें हें महत्त्वाचें असतें. युद्ध परिस्थितींत तर त्याचें महत्त्व अधिकच आहे."

## मुंबई प्रांताच्या हिशेबांतील कांहीं आकडे

### कर्जविषयक परिस्थिति

मुंबई सरकारची कर्जविषयक परिस्थिति खालीलप्रमाणें आहे:—

| | रुपये |
|---|---|
| हिंदुस्थान सरकारास देणें : | २१ कोटि, १७ लक्ष |
| पैकीं मुंबई कॉर्पोरेशन व इंप्रूव्हमेंट ट्रस्ट ह्यांस कर्जाऊ दिले ... ... | १२ कोटि, २७ लक्ष |
| निवळ देणें ... ... | १७ कोटि, ९० लक्ष |
| प्रॉव्हिडंट फंडाचें देणें ... ... | ३ कोटि, ९४ लक्ष |
| शेतकऱ्यांस व स्थानिक स्वराज्य संस्थांस कर्जाऊ दिलेलें येणें ... | १ कोटि, ४८ लक्ष |

प्रॉव्हिडंट फंडांत जेवढ्या नवीन रकमा येतात, त्यांपेक्षां सध्या द्याव्या लागणाऱ्या रकमांची बेरीज लहान होते. त्याच्या देण्यांची तरतूद पुढें केव्हां तरी करावी लागेल. शेतकऱ्यांस आणि स्थानिक स्वराज्य संस्थांस दिलेले १ कोटि, ४८ लक्ष रुपये प्रांतिक सरकारास परत मिळावयाचे आहेत.

### कांहीं प्रमुख खात्यांवरील खर्च

मुंबई प्रांताचा कांहीं प्रमुख खात्यांवरील खर्च गेल्या कांहीं वर्षांत कसा वाढला आहे, हें खालील तक्ता दर्शवितो:—

| | प्रत्यक्ष १९३५-३६ लक्ष रु. | अंदाज १९४०-४१ लक्ष रु. |
|---|---|---|
| शिक्षण | १५४ | २०४ |
| वैद्यक | ४१½ | ५० |
| आरोग्य | २३ | ३४ |
| शेती | १४¼ | १२¼* |
| सहकार | ५½ | २२ |
| पशु वैद्यक | ३¾ | ४¼ |
| उद्योगधंदे | ६ | ७¼ |
| इतर | ६¼ | ९¾ |

*पूर्वी शेतकी खात्यांत दर्शविल्या जाणाऱ्या कांहीं बाबींचा आतां सहकारी खात्यांत समावेश होतो, त्यामुळें ही घट दिसून येते.

### मुंबई-सिंध पब्लिक सर्व्हिस कमिशन

१९३५ च्या गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्टांतील ४३७ व्या कलमानुसार आतां प्रांतिक पब्लिक सर्व्हिस कमिशनें नेमण्यांत आलीं आहेत. सरकारी नोकरांची निवड करण्यासाठी परीक्षा घेणें, नेमणुका, बढत्या, बदल्या इत्यादींबाबत अंमलांत आणण्याच्या तत्त्वासंबंधांत गव्हर्नरांस सल्ला देणें इत्यादि कामें पब्लिक सर्व्हिस कमिशननें करावयाचीं असतात. मुंबई-सिंध पब्लिक सर्व्हिस कमिशननें १९३८-३९ मध्यें ११,८४१ प्रकरणांचा निकाल लावला. १३० जागांसाठी कमिशननें एकूण ६२४ उमेदवारांची मुलाखत घेतली. ज्या जागांस विशेष शास्त्रीय आणि उच्च दर्जाच्या पदव्यांची आवश्यकता होती, त्या भरण्यास कमिशनला कठीण गेलें. कारण, पुरेसा लायकीचे उमेदवार पुढें आले नाहींत. आठ बाबतींत पुनः जाहिराती देऊनहि विशेष उपयोग झाला नाहीं. वशिले लावण्याची उमेदवारांची प्रवृत्ति कमी होत चालली आहे, कारण त्या संबंधांत कमिशननें दक्षता बाळगली आहे, असा रिपोर्टांत उल्लेख आहे.

## स्वराज्याची आर्थिक बाजू

### प्रो. काळे ह्यांचें व्याख्यान

अग्रगामी भारत व्याख्यान मालेमध्यें गेल्या शुक्रवारीं मथळ्यांत नमूद केलेल्या विषयावर प्रो. काळे ह्यांनीं भाषण केलें. त्या व्याख्यानाचा सारांश खालीं दिला आहे:—

व्यक्तींप्रमाणेंच राष्ट्रांस स्वातंत्र्य निसर्गतःच प्रिय असतें. पशुपक्ष्यांमध्येंहि स्वातंत्र्यप्रियता दिसून येते, ती मानवी समाजांत प्रतीत व्हावी ह्यांत आश्चर्य नाहीं. हिंदी राजकीय पुढाऱ्यांनीं ह्या देशांत इंग्लंड, फ्रान्स वगैरे देशांतील लोकांप्रमाणेंच जनतेस राजकीय अधिकार असावे अशी चळवळ अनेक वर्षें चालविली असून तीच स्वराज्याची मागणी होय. दादाभाई नौरोजींनीं ही मागणी स्पष्टपणानें कलकत्त्यास भरलेल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनांत पुढें मांडली. त्यांनीं दीर्घकाळपर्यंत हिंदुस्थानच्या दारिद्र्याचें निवारण होण्यास हिंदी लोकांस आर्थिक व राजकीय स्वातंत्र्याची आवश्यकता कशी आहे ह्याचें विवेचन लेखांत व भाषणांत मोठ्या चिकाटीनें इंग्लंडमध्यें चालविलें होतें. हिंदी लोकांस आपल्याच देशांत जबाबदारीच्या व उच्च दर्जाच्या जागा मिळत नाहींत, हिंदी व्यापार व उद्योगधंदे येथील जनतेच्या आर्थिक उन्नतीस पोषक होत नाहींत आणि त्यांच्यामध्यें नैतिक न्यूनगंड उत्पन्न झाला आहे असें ते प्रतिपादीत. यावरूनच स्वराज्याची तहान सुराज्यानें भागत नाहीं, ह्या तत्त्वास महत्त्व प्राप्त झालें. आय. सी. एस. ची परिक्षा नुसती इंग्लंडमध्यें न घेतां ती हिंदुस्थानांतहि घेतली जावी ह्या साध्या मागणीचा पिच्छा हिंदी पुढाऱ्यांस कितीतरी वर्षें पुरवावा लागला! अविरत चळवळीमुळें अलीकडे हिंदुस्थानास स्वराज्याचे हक्क देण्याची तयारी ब्रिटिश मुत्सद्यांनीं दाखविली आहे, पण ह्या स्वराज्याचें स्वरूप व प्रमाण ह्या संबंधानें वाद उत्पन्न झाला आहे.

डोमिनिअन पद्धतीचें स्वराज्य येथें स्थापन करण्याविषयींहि घोषणा करण्यांत आली आहे आणि फेडरेशनच्या स्वरूपाच्या घटनेंत तें अंतर्भूत होण्याची योजना चर्चेचा विषय झाला आहे. पण मुस्लिम लीगला स्वराज्यांत अंतर्भूत असलेलीं दोन मुख्य तत्त्वें मुळीच मान्य नाहींत. एकराष्ट्रीयत्त्व व लोकसत्तेचें प्रभुत्व हीं तत्त्वें स्वराज्याचा प्राण आहेत, पण मुस्लिम लीगच्या मतें हिंदु व मुस्लिम अशा दोन स्वतंत्र घटना आवश्यक असून लोकशाही ह्या देशाच्या परिस्थितींत अव्यवहार्य व अनिष्ट आहे. युरोपमध्यें युद्धाच्या धामधुमींत राष्ट्रीय स्वायत्तता, स्वयंनिर्णय व लोकशाही ह्यांचें पुढें काय होणार ह्याविषयीं अनिश्चितता निर्माण झाली आहे. लहान राष्ट्रांचा तटस्थपणा अवघड झाला असून त्यांचें स्वतंत्र अस्तित्व संशयित झालें आहे. जर्मनी, रशिया व इटली ह्यांसारखीं भिन्नभिन्न राजकीय व आर्थिक ध्येयें असलेलीं राष्ट्रें युरोपची घडी आपल्या आश्रयाखालीं नीट बसवण्याच्या विचारांत आहेत. प्रस्तुत युद्धाचे अखेर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घटना कशी होईल हें कोणासच सांगतां येईनासें झालें आहे आणि डोमिनिअन स्टेटसची व्याप्ती काय राहील ह्याची शंका स्टेटसमन सारखीं पत्रें प्रदर्शित करीत आहेत. कॉंग्रेसनें स्वातंत्र्याचें ध्येय पुढें मांडलें असून त्याच्याशीं डोमिनिअन स्टेटस समानार्थी होईल असा तिचा रोख दिसतो.

ह्या गोंधळाच्या परिस्थितींतहि एकराष्ट्रीयत्व व लोकशाही ह्या तत्त्वांच्या आधारावांचून कोणतीहि समाधानकारक राजकीय घटना संभवत नाहीं हें निर्विवाद असून हिंदुस्थानांत ह्या घटनेस फेडरेशनचें स्वरूप प्राप्त होणें अपरिहार्य आहे. चाळीस कोटि प्रजा असलेल्या हिंदुस्थानांत आर्थिक सुधारणेचा प्रश्न अत्यंत जिव्हाळ्याचा असून तो सोडवण्यास स्वराज्य अगत्याचें आहे. १९३५ च्या घटना कायद्यास वरील तत्त्वांची कसोटी लावली असतां तो सदोष असल्याचें तेव्हांच दिसून येतें आणि म्हणूनच लोकसत्तात्मक व ऐनजिनसी घटनेविषयींची हिन्दी लोकांची मागणी आहे. घटना कायद्यांत संरक्षणाची व्यवस्था कायदेमंडळास जबाबदार असलेल्या मंत्र्यांच्या हातीं ठेवण्यांत आली नसून ती गव्हर्नर जनरलच्या खास अधिकारांतली बाब आहे. मध्यवर्ती सरकारच्या उत्पन्नाचा मोठा भाग लष्करावर खर्च होतो आणि त्यावर प्रधानास सत्ता नसेल तर लोकशाही राज्यपद्धति कोठें राहिली? हिंदी रेलवेज लोकांच्या मालकीच्या आहेत. त्यांची व्यवस्था धंदेवाईक पद्धतीनें व्हावी आणि त्यांचेपासून सरकारी तिजोरीस नफा मिळावा हें आवश्यक आहे. तसेंच, त्यांच्या कारभारास राजकारणाची झळ लागूं नये हें अगत्याचें आहे. पण रेलवे बोर्डावर आजपर्यंत हिंदी माणसांची नेमणूक करण्याचें सरकारनें टाळलें आहे. ह्याच्या निषेधार्थ मध्यवर्ती असेंब्लीनें रेलवे बजेट फेटाळून लावलें तरी त्याचा परिणाम सरकारवर झाला नाहीं. फेडरेशनमध्यें रेलवे बोर्डाचें रूपांतर रेलवे ऑथॉरिटींत व्हावयाचें आहे आणि गव्हर्नर जनरलला येथेंहि खास अधिकार दिला आहे. हिंदी लोकांच्या हातीं सत्ता गेल्यास तिचा योग्य उपयोग व्हावयाचा नाहीं ही भीति असल्या तजवीजीच्या मुळाशी आहे. हिंदुस्थानची पत परराष्ट्रीय बाजारांत टिकावी म्हणून कर्ज, चलन, हुंडणावळ इत्यादि बाबींत मध्यवर्ती प्रधान मंडळाच्या सत्तेवर नियंत्रणें घालण्यांत आलीं असून येथेंहि गव्हर्नर जनरलास जादा अधिकार दिलेले आहेत. फेडरेशन स्थापन होण्यापूर्वी रिझर्व्ह बँक स्थापन व्हावी आणि तिच्याकडे चलन व हुंडणावळ ह्यांची व्यवस्था सोपवावी असा आग्रह वर्तुळाकार परिषदेंत धरण्यांत आला होता आणि त्याप्रमाणें ह्या संस्थेची स्थापनाहि झाली आहे. येथेंहि हिंदी लोकांचें कर्तृत्व व हेतु ह्यांचे विषयीं अविश्वासाची वृत्ति दिसून येते. मध्यवर्ती बँकेचा कारभार रोजच्या राजकीय धामधुमीपासून अलिप्त रहावा हें योग्य आहे. पण मध्यवर्ती बँका व मध्यवर्ती सरकार ह्यांचें पूर्ण सहकार्य असावें लागतें. युद्धासारख्या परिस्थितींत तर सरकारचें राष्ट्रीय धोरण मध्यवर्ती बँकेस संभाळावें लागतें. जनतेचे प्रतिनिधी, कायदे मंडळ आणि प्रधान मंडळ, ह्यांच्या अधिकाराचें कक्षेचे बाहेर मध्यवर्ती बँक राहूं शकत नाहीं. हिंदुस्थानांतून सोन्याची निर्गत कोट्यवधि रुपयांची झाली आहे व होत आहे. तिच्या संबंधांतलें हिन्दी लोकमत सरकारास पटत नाहीं. हिन्दी उद्योगधंद्यांस जकातीचें संरक्षण मिळावें ही लोकांची मागणी अंमलांत आणण्यास सरकारनें अनेक वर्षें घेतलीं. ओटावा करार हिन्दी लोकमताच्या विरोधामुळें सरकारास रद्द करावा लागला आहे. सध्याचा काळ राष्ट्राराष्ट्रांत व्यापारी करार करण्याचा असून ते निश्चित होण्यांत लोकमत प्रभावी होणें अगत्याचें असतें.

राजकीय सत्ता आणि आर्थिक उन्नति व दारिद्र्याचें उच्चाटन ह्यांचा परस्पर संबंध किती निकट आहे हें ह्यावरून दिसून येईल. आर्थिक

प्रश्नांचे बाबतींत ब्रिटिश प्रांत व हिन्दी संस्थानें ह्यांचे हितसंबंध अप्रत्यक्ष रीतीनें पण जिव्हाळयानें निगडित झालेले आहेत. उद्योगधंदे, व्यापार, बँकिंग इत्यादि अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नांत हिंदुस्थान हें एक राष्ट्रच गणलें गेलें पाहिजे आणि त्याची मुस्लिम लीगच्या योजनेप्रमाणें विभागणी होऊं शकत नाहीं. अशी विभागणी कोणासच हितकर होणार नसून सर्वांस घातक होईल, तेव्हां स्वराज्याच्या घटनेची आर्थिक कसोटी दूरदर्शीपणानें लावली पाहिजे आणि लोकशाही, एकराष्ट्रीयत्व व देशाची सर्वांगीण उन्नति ह्यांचे गुंतागुंतीचे पण जिव्हाळ्याचे संबंध लक्षांत घेऊन आपण पुढें पाऊल टाकलें पाहिजे. प्रस्तुत युद्ध व युद्धोत्तर काल हा आणीबाणीचा प्रसंग जगाच्या अनुभवास यावयाचा आहे आणि त्यांतून हिंदुस्थान निभावून जावयाचा असेल तर हिंदी पुढाऱ्यांनीं शहाणपणानें व शक्य तितक्या जुटीनें वागलें पाहिजे. नाहीं तर देशाची नैसर्गिक व मानवी अनुकूलता जनतेला उपयोगी न पडतां वाया जाईल आणि राष्ट्रीय प्रगति व अस्तित्व धोक्यांत येईल.

### सहकारी जमीन गहाणाच्या बँकांची परिषद

ह्या प्रांतांतील प्राथमिक सहकारी जमीन गहाणाच्या बँका आणि जमीन गहाणाची सहकारी प्रांतिक बँक ह्यांच्या प्रतिनिधींची परिषद मुंबईस येत्या ३० व ३१ ह्या तारखांस भरणार असून तिमध्यें ह्या संस्थांपुढें असलेल्या अवघड व अडचणीच्या प्रश्नांची चर्चा व्हावयाची आहे.

### हिंदुस्थानांत मोटारींची आयात

१९३९ सालीं ग्रेटब्रिटननें निर्गत केलेल्या ७० हजार मोटारींपैकी ६,००० मोटारी हिंदुस्थान आणि ब्रह्मदेश ह्यांनीं घेतल्या. चालू युद्धाच्या तिसऱ्या महिन्यांतील ब्रिटिश मोटारींच्या निर्गतीची रोजची सरासरी ३०० मोटारी इतकी भरली. गेल्या पांच वर्षांतील वार्षिक निर्गतीची सरासरी ६२ हजार मोटारींइतकी आहे.

### मोटारींत सुधारणा

मोटारींची बनावट सुधारत चालली असून गेल्या १५ वर्षांतील प्रगति विशेष उल्लेखनीय आहे; अमेरिकेंतील मोटारींसंबंधीचे खालील आकडे ह दर्शवितात:—

| | आज | १५ वर्षांपूर्वी |
|---|---|---|
| व्हील बेस | १२१ इंच | ११४ इंच |
| किंमत | ९४५ डॉलर | १,६९५ डॉलर |
| वजन | ३,६६० पौंड | ३,२५६ पौंड |
| शक्ति | १०७ अश्वशक्ति | ५१ अश्वशक्ति |
| वेग (दर ताशीं) | ३० मैल अधिक | —— |
| टायरची किंमत | १६ डॉलर | २३ डॉलर |
| टायरचें आयुष्य | २७ हजार मैल | ५ हजार मैल |

### विमा कायद्यांत दुरुस्ती

१९३८ च्या इन्शुअरन्स ॲक्टांत दुरुस्ती करणारें एक बिल मध्यवर्ती असेंब्लीस सादर करण्यांत आलें आहे. ब्रिटिश हिंदुस्थानांतील प्रत्येक विमा कंपनीस रिझर्व्ह बँकेकडे डिपॉझिट ठेवावें लागतें. हें डिपॉझिट ज्या विशिष्ट सरकारमान्य रोख्यांचे स्वरूपांत ठेवलें तरी चालतें, त्या रोख्यांची यादी वाढवून त्यांत हिंदी संस्थानांच्या कर्जरोख्यांचाहि समावेश व्हावा, अशा अर्थाची एक दुरुस्ती त्या बिलांत अंतर्भूत आहे. अर्थात्, हे रोखे ह्या ॲक्टाचे संबंधांत सरकारमान्य असल्याचें हिंदुस्थान सरकारनें आपल्या गॅझेटांत जाहीर केलें पाहिजे.


पूर्व खानदेश
सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.
जळगांव.
( स्थापना : मे १९१६ ) रु.

| | |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल. ...... | १०,००,०००।- |
| जमा झालेलें शेअर भांडवल....... | ४,६९,०००।- |
| रिझर्व्ह फंड. ...... | २,९८,०००।- |
| इतर फंडस्. ...... | ३,७७,०००।- |
| खेळतें भांडवल (३०-६-३९) ...... | ५७,८९,०००।- |

डिव्हिडंड पांच टक्के ( सहा वर्षांपासून )

हेड ऑफिस :—सेंट्रल को-आपरेटिव्ह बँक बिल्डिंग, नवी पेठ, जळगांव.

पूर्व खानदेश जिल्ह्यांतील सर्व भागांत शाखा व पे-ऑफिसेस चांगल्या रीतीनें चालू आहेत.

—: बँकर्स :—
मुंबई : मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-आपरेटिव्ह बँक लि. मुंबई.
जळगांव : इंपीरिअल बँक ऑफ इंडिया.
अहमदाबाद : बँक ऑफ इंडिया लि.
नागपूर : सी. पी. अँड बेरार प्रॉव्हिन्शिअल को-आपरेटिव्ह बँक लि. नागपूर.

बँकेचे हिशेब त्रैमासिक रजिस्टर्ड अकौंटंटचे फर्मकडून व वार्षिक सरकारी स्पेशल ऑडिटराकडून तपासले जातात.

चालू ठेवीवर : अर्धा टक्का व्याज दिलें जातें.
सेव्हिंग्ज ठेवीवर : दोन टक्के व्याज देण्यांत येतें.
मुदतीच्या ठेवीवर : तीन ते साडे चार टक्के व्याज मुदतीप्रमाणें देण्यांत येतें.

ठेवीदाराचे व्यवहार सोयीप्रमाणें बँकर्स मार्फत केले जातात. बँकेशीं व्यवहार करणारांचे सोयीप्रमाणें बँकर्स मार्फत योजना करण्यांत येते.

सर्व प्रकारच्या मुदतीच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात. सर्व प्रकारचा बँकिंगचा व्यवहार केला जातो. ठेवीवरील व्याजाचे दर अगर व्यवहाराच्या अटी समक्ष अगर पत्रद्वारें कळविण्यांत येतील.

को-ऑपरेटिव्ह संस्थांना मुदतीच्या ठेवीवर इतरांपेक्षा अर्धा टक्का व्याज जास्त देण्यांत येतें.

बी. डी. देशमुख,
चेअरमन.



बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी ताजी आवृत्ति प्रसिद्ध झाली.
☞ किं. १ रु. ८ आणे ☜
१ रु. १० आ. ६ पै चीं तिकिटें पाठवून मागणी करा.
: लेखक :
प्रो. बा. गो. काळे ◆ श्री. श्री. बा. काळे
बँकिंगविषयक प्रश्नांचें विवेचन करणारें
अत्यंत उपयुक्त पुस्तक
" अर्थ " ग्रन्थमाला, : : पुणें ४.

### विद्यार्थ्यांची फसवणुकीबद्दल फिर्याद

"हनुमान". नांवाच्या एका तामिळ साप्ताहिकांतील "रॉयल टेलिग्राफ अॅन्ड रेल्वे ड्यूटीज् कॉलेज" ह्या मुंबईतील संस्थेची जाहिरात वाचून कोइमतूर जिल्ह्यांतील एक विद्यार्थी मुंबईस आला आणि त्याची फसवणूक झाली अशी तक्रार आहे. ह्यासाठी त्यानें कॉलेजचा डायरेक्टर, एस. डी. शर्मा ह्याजवर फसवणुकीबद्दल दादर येथील प्रेसिडेन्सी कोर्टांत फिर्याद दाखल केली आहे. ह्या विद्यार्थ्याची कैफियत अशी आहे कीं, त्यानें "सरकारनें रजिस्टर केलेल्या, हिंदुस्थानांतील सर्वांत जुन्या, १९१४ सालीं स्थापन झालेल्या आणि ज्याचे अभ्यासक्रम मुंबई, नागपूर, मद्रास, कोलंबो, दिल्ली आणि लाहोर येथील शिक्षणाचे अनुभवावर आधारलेले आहेत अशा" ह्या कॉलेजचें माहितीपत्रक आठ आणे देऊन मागवलें आणि इन्शुअरन्स करून पोस्टानें १८० रुपये पाठविले. जागेवर कॉलेजच्या नांवाची पाटी नाहीं, जागेंत विजेचे दिवे नाहींत, विद्यार्थ्यांस रॉकेलचे दिवे अगर मेणबत्त्या वापराव्या लागतात, कॉलेजांत शास्त्रीय उपकरणें नाहींत, एका शिक्षकाखेरीज दुसरा कोणी शिक्षक नाहीं, अशी त्यास परिस्थिति आढळल्याची त्याची तक्रार आहे. त्याची आणि कॉलेजच्या डायरेक्टराची कधीच गांठ पडली नाहीं आणि तो कॉलेज बंद करण्याचे विचारांत आहे, असें त्या विद्यार्थ्यानें आपल्या तक्रारींत म्हटलें आहे. दाव्याची सुनावणी लवकरच होईल.

---

### जपानमधील घटस्फोट

सर्व जगांतील देशांत जपान आणि ग्रेटब्रिटन येथें घटस्फोटांचें प्रमाण सर्वांत मोठें आहे. १९१५ पर्यंत ह्या बाबतींत जपानचा अनुक्रम पहिला होता, ती जागा आतां अमेरिकेनें घेतली आहे. अमेरिकेंतील घटस्फोटांचें प्रमाण वाढत चाललें आहे. १९०० मध्यें जपानमध्यें घटस्फोटांचें दर लक्ष लोकसंख्येशीं प्रमाण १४२ होतें तें १९३८ मध्यें ६२ वर आलें. अमेरिकेंतील तत्सम आकडे ५३ आणि १७१ आहेत. जपानमधील टोकियो, ओसाका, कोबे, इत्यादि औद्योगिक शहरांतून घटस्फोट कमी आढळतात. परंतु जेथें पूर्वीची कुटुंबपद्धति चालू आहे अशा ठिकाणीं ते अधीक आढळतात. म्हणजे, औद्योगीकरणाचा इतर देशांत दिसून येणारा परिणाम जपानमध्यें दिसून येत नाहीं. घटस्फोटांचें प्रमुख कारण, अविभक्त कुटुंबांतून मुलींचें आणि त्यांच्या पत्नींचें न पटणें हें होय. पतिपत्नीस संतति असल्यास घटस्फोट कमी होतात, असें आढळून आलें आहे. घटस्फोटांची उतरती संख्या हें जपानमध्यें कौटुंबिक सुख वाढत्या प्रमाणावर असल्याचें निदर्शक समजतां येईल काय?

---

### रोजच्या वाचनांतील कांहीं शब्द

अंकारा अगर अंगोरा—कॉन्स्टँन्टिनोपलचे जागीं अंगोरा ही तुर्कांनी आपली राजधानी १९२०सालीं केली. समुद्रकिनाऱ्यापासून हें शहर बरेंच दूर आहे.

ब्लॉकेड—शत्रुपक्षीयांचे देशांत मालाचा प्रवेश होऊं नये अगर त्यांतून माल बाहेर जाऊं नये ह्यासाठी केलेली योजना.

ब्यूरॉक्रसी—राष्ट्राच्या हितास बाधक होणाऱ्या पद्धतीनें सरकारी नोकरांनीं आपल्या खात्यांचें महत्त्व वाढवून चालविलेला राज्यकारभार.

कॉन्ट्राबँड—युद्धपयोगी माल. उ. दारूगोळा. ह्या शब्दाच्या व्याख्येंत आतां धातु, रसायनें, कोळसा, इतकेंच नव्हे तर खाद्य पदार्थांचाहि समावेश होतो.

सारब्रुकेन—सार नदीवरील कोळशाच्या खाणीच्या मुलखांतील १३ लक्ष लोकवस्तीचें जर्मन शहर.

स्पृहणीय यश
बोनसचे दरांत २० टक्के वाढ
तारीख १० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या मूल्यमापनाचा निकाल.

| हयातीनंतरचे विम्यावर | त्रैवार्षिक-दर हजारीं | हयातींतील विम्यावर |
| --- | --- | --- |
| रु. ५४ | बोनस | रु. ४५ |

आजच "कॉमनवेल्थ" ची पॉलिसी घेऊन कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.
दि कॉमनवेल्थ अॅशुअरन्स कंपनी लि० पुणें
लिहा अगर समक्ष भेटा.
श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी. मॅनेजिंग एजंट.
सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजन्ट आकर्षक अटींवर नेमणें आहेत.

रूरल प्रॉडक्टस् कं. लि. चे
★ संत्रा ड्रिंक ★ जांभळाचा रस
★ जांभळाच्या बियांची पूड ★ इतर रस व पेयें
सर्व मोठ्या व महत्त्वाच्या ठिकाणीं विकण्यासाठीं जबाबदार प्रतिनिधि पाहिजेत.
रजिस्टर्ड ऑफिस: ७५४ शुक्रवार, पुणें २ | बिझिनेस ऑफिस: ९९१A सदाशिव, पुणें २
न. गं. आपटे, बी. एजी., एम्. एस्सी.

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
Examiner Press Building, Dalal Street, Bombay
716 Sadashiv Peth, Poona City

K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |
| **सरकारी आणि निमसरकारी रोखे** | |
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | १११–१४ |
| ५% ( १९४०–४३ ) लोन ... ... ... | १०१–११ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०६—२ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९३–१० |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०४—६ |
| ३% ( १९६३–६५ ) ... ... ... | ९३—२ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९७–९½ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०६—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०५—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) ... .. | ११०–१२ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२१—० |
| **मंडळ्यांचे भाग** | |
| ( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.) | |
| **बँका** | |
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% ... ... | १३७–१२ |
| बँक ऑफ बडोदा (१००—५०) १०% ... ... | ९९—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ४% ... | ३६—३ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५२०—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ४% ... ... | ५३—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०९—० |

| | |
|---|---|
| **वीज** | |
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | १३१—४ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | १९१—४ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | १८२—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५¾% ... ... | १३६२—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १५१७—८ |
| **रेल्वेज** | |
| दौंड–बारामती ( १०० ) ४¾% ... ... | ९५—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) २% ... ... | ७२—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९५५—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७५७—८ |
| **इतर** | |
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | २१५—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४५—० |
| शिंदया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | १८—२ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ... | ३८—८ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४३५०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २०३–१२ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. ... | १४४—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३८०—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै ... | २०१५—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु | १२०—० |





एजंटः—
**महादेव गोविंद कुलकर्णी**
किराणा व भुसार मालाचे व्यापारी
७८६ सदाशिव पुणें शहर.

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
**जर्निमन टेलर व्हा.**
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
**पराडकर टेलर्स ॲकेडिमी**, ६७२ सदाशिव, पुणें.

हप्त्याचे अत्यंत कमी दर असलेल्या
**दि ग्रेट सोशल लाइफ ॲन्ड जनरल अशुअरन्स कं. लि.**
ह्या महाराष्ट्रीय विमा संस्थेचा पहिल्या पंचवार्षिक मूल्यमापनाचा निर्णय

हयातींतील विम्यावर दर हजारीं **५०**

हेड ऑफिस : जळगांव ( पू.खा. )
मुंबई शाखा : को–ऑपरेटिव्ह बिल्डिंग,
फेरोजशा मेथा रोड.

हयातीनंतरच्या विम्यावर दर हजारीं **६०**

# CONFIDENCE

**is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its,**

## YEARS OF

**Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service**

**HAS CREATED**

## PUBLIC CONFIDENCE

**The following figures will convince you:**

## NEW BUSINESS

**Last year 1937-38**
**Exceeds**
**Rs. 3 CRORES**

## BONUS

**PER THOUSAND PER YEAR**
**On Endowment Rs. 23 | On Whole Life Rs. 20**

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches* : Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.
*Office* : throughout India & the East.

**S. C. MAJUMDAR,**
**MANAGER : Bombay Branch.**

**POONA OFFICE — 180, Budhwar Peth**

# N. V. WADNERKAR

**Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.**

**- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -**

**POONA CITY.**

# अर्थशास्त्र

**लेखक—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे**

**पृष्ठसंख्या सुमारें ५००, किंमत ५ रुपये**

या ग्रंथात अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचे विवेचन केलें आहे.

फर्म, कंपनी, सोसायटी

# कायदा

लेखक : श्री. के. बा. गजेंद्रगडकर, वकील, बी. ए. ( ऑनर्स ), एलएल्. बी.

"न्यायबोध"या कायद्याच्या मासिकांतून क्रमशः प्रसिद्ध झालेली लेखमाला आतां पुस्तकरूपानें तयार झाली. फर्म, कंपनी, सोसायटी यांच्या कायद्यासंबंधीं विवेचन या पुस्तकात केलेलें आहे. हें विवेचन मुंबई इलाख्यांतील कायद्याला अनुसरून असल्यामुळें हें पुस्तक संग्रहीं ठेवणें अवश्य आहे. ट.ख. सह किंमत ८६ आण्यांचीं तिकिटें पाठवा.

**मॅनेजर : सेंट्रल लॉ हाउस,**
तुळशीबागरोड :: नागपूर शहर


# विमा—जगत्

**विमाविषयक प्रश्नांची सांगोपांग चर्चा करणारें मराठींतील एकमेव मासिक.**

**जानेवारी १९४० पासून ३ र्‍या वर्षास सुरुवात.**
**केव्हांहि वर्गणीदार होतां येतें.**

## वार्षिक वर्गणी फक्त २ रुपये

दर महिन्याच्या १५ तारखेस प्रसिद्ध होतें.
व्यवस्थापक—विमा—जगत्, पुणें २.




## स्त्रियांचा आजार

म्हणजे मुख्यतः विटाळदोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे यादीवरून तयार केलेलें असून आज सतत ६० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकाली गर्भपात, होणें मुलणें, शौच्यास साफ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्ये असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.

किंमत बाटलीस ३ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारास टपालखर्चासह फक्त ९ रुपये.

**श्री इंडो फॉरिन एजन्सीज. ( डि. नं. ६ )**
१५३।३ माधवविलास, टिळकवाडी, पुणें २.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व श्रीमंत वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.